**निरोप**

केशरलेल्या कातरवेळी
सांज गारवा उदास होतो
तुझे मागे वळून पहाणे
निरोप रोजचा कठीण होतो ।

किती गुंतलो, ऊन-सावली
धावत धावत मागे आली
तुझ्या साक्षीने नभी उडाली
हसली फसली आणि सांडली ।

सावळ-माया दिशात चमके
निळी-जांभळी ,लाल रुपेरी
अनंत रंगी कवे घेतले
तरीही हुंदका दाटी अंतरी ।

अटळ रेषा, शाप कोणता?
सुन्न उसासे,  विरह अंती
काजळमाया , सुकी-कोरडी
सावलीला अजाण विरक्ती |

**-------संध्या रानडे**